दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990





लातूर वर्ष ३ रे अंक ३०३ वा मंगळवार दि.१४ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# लातूरसह राज्यात कोरोनाचा नवा व्हेरिएंट; ९१ जणांमध्ये निदान

पुणे : प्रतिनिधी

लातूरसह राज्यात कोरोनाचा नवीन उपप्रकार आढळला आहे. केपी.२ (फ्लर्ट) असे या उपप्रकाराचे नाव आहे. आरोग्य विभागाच्या म्हणण्यानुसार, आतापर्यंत ९१ कोरोना रुग्णांमध्ये या नवीन उपप्रकाराचे निदान झाले आहे. त्यामुळे जे रुग्ण आधीच इतर आजारांनी ग्रस्त आहेत, त्यांना सावध राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.



जे.एन. १ व्हेरिएंटनंतर, केपी.२ चा अमेरिकेत अधिक प्रभाव दिसून आला. राज्याच्या आरोग्य विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील ९१ जणांमध्ये नवीन उपप्रकाराचे निदान झाले असून त्यात पुण्यातील ५१, ठाणे २०, अमरावती ७, छत्रपती संभाजीनगर ७, सोलापूर, अहमदनगरमधील २ रुग्णांचा समावेश आहे.

लातूर, नाशिक आणि सांगलीमध्ये प्रत्येकी एक रुग्ण आढळला आहे. नवीन सब-व्हेरिएंटचा एकही रुग्ण मुंबईत आढळलेला नाही. शुक्रवारी (ता.१०) राज्यात ८ नवीन कोविड रुग्ण आढळले. त्यात मुंबईतील ४, ठाणे, पनवेल, सांगली व छत्रपती संभाजीनगरमधील प्रत्येकी एका रुग्णाचा समावेश होता

कोरोनाच्या जे.एन.१ प्रकारातील उत्परिवर्तनानंतर केपी.२ उपप्रकार तयार झाला आहे. कोविड विषाणूशी लढण्यासाठी आपले शरीर जसजसे मजबूत होत आहे, तसे विषाणूदेखील उत्परिवर्तन करत आहे आणि त्याचे अस्तित्व वाचवण्याचा प्रयत्न करत आहे.

# मान्सून वेळेआधीच दाखल होणार

मुंबई : हवामान खात्याने सांगितले की, नैऋत्य मान्सून त्याच्या नियोजित वेळेपेक्षा तीन दिवस आधीच पुढे सरकत आहे. हवामान खात्यानुसार, नैऋत्य मान्सून १९ मे च्या सुमारास दक्षिण अंदमानच्या समुद्रात दाखल होणार आहे. याशिवाय तो त्याच दिवशी दक्षिण-पूर्व बंगालच्या उपसागराच्या काही भागातही प्रवेश करणार आहे. दरवर्षी २२ मे रोजी मान्सून या भागात पोहोचतो, मात्र यंदा तो तीन दिवस आधी दाखल होणार आहे. आज मुंबईसह उपनगरामध्ये झालेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. येत्या २४ तासांत मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

केरळमध्ये साधारणपणे १ जूनच्या आसपास मान्सून दाखल होत असतो. त्यानंतर तो उत्तरेकडे सरकतो. १५ जुलैदरम्यान तो संपूर्ण देशात पोहोचतो. यंदा देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल, असा अंदाज आधीच हवामान खात्याने व्यक्त केला आहे. भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार जून ते सप्टेंबर दरम्यान देशभरात मान्सूनचा पाऊस अधिक ५% च्या फरकाने सुमारे १०६% अपेक्षित आहे, जो सामान्यपेक्षा जास्त मानला जातो.

सन १९७१-२०२० पर्यंतच्या दीर्घकालीन आकडेवारीच्या आधारे संपूर्ण हंगामातील दीर्घकालीन सरासरी पर्जन्यमान ८७ सेमी असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. गेल्या वर्षी मान्सूनचा दीर्घ कालावधीचा सरासरी पाऊस ९४.४% म्हणजेच सामान्यतेपेक्षा कमी होता. त्यापूर्वी २०२२ चा मान्सून एलपीएच्या १०६% वर सामान्यपेक्षा जास्त होता; २०२१ मध्ये दीर्घ कालावधीतील मान्सूनचा सरासरी पाऊस ९९% वर सामान्य आणि २०२० मध्ये पुन्हा सामान्यपेक्षा १०९% नोंदवला गेला. हवामान खात्याने म्हटले आहे की मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात एक अद्यतनित अंदाज पुन्हा जारी केला जाईल, ज्यामध्ये उत्तर-पश्चिम भारत, मध्य भारत, दक्षिण द्वीपकल्प आणि ईशान्य भारतातील मान्सूनची स्थिती आणि अंदाज याविषयी माहिती अद्यतनित केली जाईल.



# गोविंद कुंचमवार यांनी अशोक हनवते व रघुनाथ बनसोडे यांचा वाढदिवस साजरा केला



लातूर :- लातूर येथील अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर, रघुनाथ बनसोडे माजी नगरसेवक तथा दैनिक लातूर प्रभातचे संपादक या दोघांचा २२ एप्रिल, ११ मे एकत्र वाढदिवस गोविंद कुंचमार बी एस एन एल चे सेवानिवृत्त अधिकारी तथा दैनिक महावृत्तचे कार्यकारी संपादक यांनी गांधी चौक येथील रसिका हॉटेलमध्ये शाल पुष्पगुच्छ देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष न पा घोणे, पत्रकार नितीन चालक, पालकर आधी उपस्थित होते.



ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक जीवनधर शहरकर गुरुजी यांचे आज निधन झाले. लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी त्यांच्या पार्थिवाला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. तसेच त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

# तथागत भगवान बुद्ध जयंती निमित्त भव्य श्रामनेर दीक्षा समारंभ शिबिरास प्रारंभ

लातूर :- दहा दिवसीय भव्य श्रामनेर संस्कार प्रशिक्षण शिबिर पु. भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांचे मार्गदर्शन आणि भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या संयोजनाखाली बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व सर्व लातूरकरांच्या सौजन्याने दहा दिवसीय श्रामनेर संस्कार प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे. या श्रामनेर पब्बजा संस्कार शिबीराचा भव्य दिक्षा समारंभ राजा शुद्धोधन बुद्ध विहारात संपन्न झाला. या संस्कार शिबिरामध्ये १०० जणांनी दिक्षा घेतली. यावेळी भिक्खू पय्यानंद थेरो बोलताना म्हणाले की, बौद्ध धम्माचा अभ्यास, चिंतन, नैतिक संस्कार, बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी, धम्मासाठी जबाबदार, कर्तव्यशील, उपासक आणि दायक घडविणे, तरुण वर्गाला धम्माप्रती आवड, श्रद्धा व निष्ठा निर्माण करणे, युवा वर्ग व्यसनमुक्त करणे याकरिता समाजात वेळोवेळी श्रामनेर पब्बजा संस्कार प्रशिक्षण शिबिर आयोजित करणे आवश्यक आहे. हा उद्देश ठेवून बुद्ध जयंतीच्या निमित्ताने लातूर शहरात दि.



१३ मे ते २३ मे २०२४ पर्यंत १० दिवसीय श्रामनेर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर संपूर्ण शहर व ग्रामीण भागात फिरणार असून त्यात प्रामुख्याने बालाजी नगर, प्रबुद्ध नगर, लूंबिनी नगर, इंदिरा नगर, लेबर कॉलनी, संजय नगर, आनंद नगर, प्रकाश नगर, सिद्धार्थ सोसायटी, नालंदा सोसायटी, बौद्ध नगर, राजे शिवाजी नगर, विकास नगर आदी भागात हे शिबीर चारिका करणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, आनंद सोनवणे, गौतम सूर्यवंशी, सूर्यकांत दांडे, विक्रम चिकाटे, वसंत वाघमारे, हेमंत जाधव, विशाल कांबळे, राजा शुद्धोधन बुद्ध विहाराचे सर्व विश्वस्त मंडळ, विनोद कोल्हे, उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, भगवान नरवाडे, नागेश अहिरे, अविनाश आदमाने, पांडुरंग अंबुलगेकर, मिलिंद धावारे व महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.

# येणाऱ्या काळात आमचे काम दिसून येईल - नूतन अध्यक्ष आदिनाथ सांगवे

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, लातूर जिल्हा शाखेच्या वतीने बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या नूतन संचालकांचा सत्कार









लातूर : बसवेश्वर शिक्षण संस्थेचे नूतन संचालक मंडळाची निवड झाल्यानंतर पहिल्यांदाच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने नूतन अध्यक्ष आदिनाथ सांगवे, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज येरटे यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे लातूर जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते, शहराध्यक्ष महादेव डोंबे, इले. प्रमुख हरून मोमीन, उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, कोषाध्यक्ष अरुण कांबळे, जिल्हा कार्यकारणी सदस्य खय्युम शेख आदि सह बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य संजय गवई, माजी प्राचार्य सिद्राम डोंगरगे आदि सह पत्रकार व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी सत्काराला उत्तर देताना अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की पत्रकार संघाने केलेला सत्कार हा आमचा पहिला सत्कार असून येणाऱ्या काळात आमच्या कामातून संस्थेचा विकास दिसेल व संस्थेला गत वैभव प्राप्त करून मिळवून देऊ अशी ग्वाही त्यांनी नूतन संचालक मंडळाच्या वतीने यावेळी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे लातूर जिल्हा शहराध्यक्ष महादेव डोंबे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर यांनी समाजाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी, वंचित व दुर्बल घटकासाठी, शैक्षणिक सुविधा मिळाल्या पाहिजेत तसेच जाती जातीतील भेदभाव दूर करून जाती पंथाच्या भिंतीत सोडून सर्व मानव एकच आहे मानव जातीच्या कल्याणासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे या दृष्टिकोनातून त्यांनी त्या काळात अनेक पावलं उचलले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांनी पत्रकार संघ व बसवेश्वर संस्थे विषयी आगामी काळाबद्दल चांगल्या अपेक्षा व्यक्त केल्या. शेवटी आभार जिल्हा सचिव अशोक हनवते यांनी मानले.

## संपादकीय....

# नेपाळ आणि इंटरनेट सेवा

नुकत्याच महत्त्वाच्या दोन बातम्या नेपाळमधून समोर आल्या आहेत. पहिली बातमी म्हणजे नेपाळ सरकारने १०० रुपयांची नवी नोट जारी करत यावरील नेपाळच्या नकाशात भारताचा लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी प्रदेश दाखवले जाणार आहेत. दुसरी बातमी म्हणजे नेपाळमध्ये इंटरनेट सेवा बंद केली असून, द काठमांडू पोस्टमध्ये यासंदर्भात 'भारतीय कंपनीने सेवा बंद केल्याने नेपाळमध्ये इंटरनेट व्यत्यय' अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे नेपाळने नवीन नोटेवर भारताचा भूभाग दाखविण्याचा प्रयत्न केल्यामुळे तर भारताने इंटरनेटवर बंदी घातली नाही ना, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

भारताच्या राजकीय नकाशात उत्तराखंड हे नेपाळच्या सीमेला लागून असून लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हे प्रदेश राज्याच्या पिथोरगड जिल्ह्यात येतात. नेपाळची केंद्रीय बँक नेपाळ राष्ट्र बँकेने २५ एप्रिल आणि २ मे दरम्यान घेतलेल्या बैठकीत नोटेवर हा भाग दाखवावा, अशी शिफारस सरकारला केली होती. त्यामुळे नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल यांनी मंत्र्यांसह १०० च्या नव्या नोटेवर हा प्रदेश नेपाळचा भाग म्हणून दाखवला जाईल, असा निर्णय घेतला आहे. कोणत्या आधारावर नेपाळ या क्षेत्रावर दावा करत आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, सुगौली करार (१८१६) अंतर्गत, या तीन भागांसह काली नदीच्या पूर्वेकडील सर्व क्षेत्रे नेपाळचा अविभाज्य भाग असून, १९२३ मध्ये झालेल्या नेपाळ–ब्रिटन मैत्री कराराचे पालन करत आहोत, असे नेपाळचे म्हणणे आहे.

१९५० मध्ये भारत आणि नेपाळमध्ये शांतता आणि मैत्री करार झाला असून, आता नेपाळने सुगौली करार बेकायदा ठरवला आहे. १९५० च्या करारानुसार, लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हे क्षेत्र भारताच्या अखत्यारित आहे आणि त्याचा वापर भारत सुरुवातीपासूनच करत आहे, असे भारताचे म्हणणे आहे.

नेपाळमध्ये खंडित झालेल्या इंटरनेट सेवांशी या निर्णयाचा काही संबंध आहे काय? तर यामध्ये कोणताही दुवा नसून मूळ कारण हे पेमेंटचे आहे. नेपाळमध्ये इंटरनेट पुरवले जाते, ते प्रत्यक्षात भारतातूनच उपलब्ध होते. भारतातील एअरटेलसारख्या कंपन्यांकडून नेपाळच्या दूरसंचार कंपन्या इंटरनेट सेवा घेऊन पुरवतात. वास्तविक नेपाळमधील इंटरनेट प्रदाता दूरसंचार कंपन्यांनी यापूर्वीच इंटरनेट सेवा कधीही बंद होऊ शकते, असा इशारा दिला होता, कारण प्रत्यक्षात भारतातील सेवा प्रदाता कंपन्यांना विशेषतः एअरटेल कंपनीला नेपाळद्वारे त्याचे पेमेंट केलेले नाही.गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये भारतातील अनेक इंटरनेट सेवा विक्रेत्यांनी धमकी दिली होती की, त्यांना पैसे मिळाले नाहीत, तर ते त्यांना दिली जाणारी इंटरनेट सेवा १ जानेवारी, २०२४ पासून बंद करतील. नेपाळच्या इंटरनेट प्रदाता दूरसंचार कंपन्यांद्वारे ३ अब्ज नेपाळी रुपये भारतीय विक्रेत्या कंपन्यांना देणे बाकी आहे. ते देण्यास नेपाळी कंपन्या तयार नाहीत असे नाही; पण अडचण ही आहे की, हा व्यवहार आंतरराष्ट्रीय असून, तो नेपाळ सरकारद्वारे होणे आवश्यक आहे.नेपाळ सरकार त्यांच्या कंपन्यांना सांगत आहे की, जे पेमेंट तुम्ही डॉलरमध्ये दिले आहे ते पेमेंट भारताला देऊ; परंतु त्यापूर्वी तुम्ही आम्हाला आमचा अनेक वर्षांचा प्रलंबित कर द्यायला हवा. भारतात स्पेक्ट्रम वाटपावरून केलेल्या कराबाबत दूरसंचार कंपनी आणि सरकारमध्ये अनेक वाद सुरू होते, तसेच हे वाद नेपाळ सरकार आणि त्यांच्या कंपन्यांमध्ये सुरू आहेत. नेपाळच्या कंपनीकडे अनेक वर्षांपासून खूप पैसा थकीत आहे. जोपर्यंत या कंपन्या थकीत कर भरत नाहीत, तोपर्यंत हे पैसे भारतातील इंटरनेट विक्रेत्यांकडे हस्तांतरित करणार नाही, अशी भूमिका नेपाळ सरकारने घेतली आहे.

# १४ मे छत्रपती संभाजी महाराज जयंती

धर्मवीर संभाजी महाराज.

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला.संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले. परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्र सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते. छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती–घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला. त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला.त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला. परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले.औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही. संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली. तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रृरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात–पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रृरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र का जन्माला का आला नाही?याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात.संभाजी महाराजांना बलिदान दिनानिमित्त निमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनाचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य , शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख–समाधान प्राप्त होईल.कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो–बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यायीमुळेच.हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले. परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे



रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल. आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण–बाण–शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे.छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा.

हर हर महादेव!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार.
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,नागपूर) मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# शुर छत्रपती राजे संभाजी...

संभाजी महाराज हे जागतिक शुर राजांपैकी एक शुरविर राजे होत. भारतात जाती धर्मावरून भेदभाव करून महापुरुषांचे कर्तृत्व दाबण्याचा प्रयत्न येथील स्वयंघोषित श्रेष्ठ समजणारे विकृत विचाराचे लोक करत असतात. त्याला छत्रपती संभाजी महाराज अपवाद कसे ठरणार? छत्रपती संभाजी महाराज यांच्या शुर पराक्रमा विषयी लिहताना निच लोकांनी लेखणीचा गैरवापर करून छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाचे आहे तसे वर्णन केलेच नाही. सर्व खेळ हा शब्दांचा व लिखाणाचा असतो. छयपती संभाजी महाराज यांनी पराक्रम गाजवले परंतु त्याच्या नोंदी ठेवणाऱ्या लोकांनी बदमाश पणा करून जागतिक शुरविर राजाला महाराष्ट्रा पुरते मर्यादित करून ठेवले. संभाजी राजे हे जिजाऊंच्या संकल्पनेतील स्वराज्याचे दुसरे राजे. जिजाऊंच्या संकल्पनेतील स्वराज्य म्हणजे जाती भेद, विषमता विरहित स्वराज्य होते. अठरा पगड जातीच्या लोकांना एकत्र करून त्यांच्या जोरावर राजेशाही मध्ये राजांकडून व त्यांच्या यंत्रनेकडून होणारी लुट व जनतेवर होणारे अन्याय अत्याचार थांबण्यासाठी स्वराज्य उभे केले गेले. व याच स्वराज्यामध्ये समता प्रस्थापित करून स्वराज्यातील जनतेवरील अन्याय अत्याचार बंद करण्याचे ध्येयधोरणे आखली गेली. अठरा पगडजाती, आलुतेदार, बलुतेदार सगळे लोक विषमतेच्या नावाखाली विभागले गेले होते. स्वराज्याच्या माध्यमातून एकत्र करण्याचे काम केल्या गेले. शुरविर, कर्मवीर असलेल्या संभाजी महाराज यांच्या विषयी इतिहासातील निच लोकांनी नैतिक बदनामी तर केलीच आहे परंतु संभाजी महाराज यांना धर्मवीर घोषीत करून त्यांचे कर्म लपण्याचे कटकारस्थान सुरू आहे. सध्या देशात सामाजिक विषमता व द्वेष वाढण्यासाठी ज्या महामानवांनी जनतेच्या कल्याणा साठी, देशाच्या हितासाठी आपले आयुष्य खर्च केले अशा लोकांना जातीत बंद करून त्यांचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न सतत होत आहे. विषमता वाद कायम रहावा आणि स्वयंश्रेष्ठ समजणाऱ्या लोकांचे नसलेले वर्चस्व कायम राहण्यासाठी इतिहासा सोबत छेडछाड करून चुकीचा इतिहास मांडला जातो. आणि अशा कुटील षडयंत्राला जाती धर्माच्या नावाखाली मेंदूचा वापर न करणारे लोक फसतात व असत्याला सत्य समजतात. कोणत्याही बाबीच्या मुळाशी जाऊन सत्य शोधन्याचा प्रयत्न करत नाहीत. आणि ज्यांनी सत्य शोधले त्याला धर्मविरोधी समजतात. छत्रपती संभाजी महाराज यांचा विचार केला तर स्वराज्यातील जनता सुखी होती मग तो कोणत्याही जाती धर्माचा का असेना सर्वांना समान न्याय होता. परंतु छत्रपती संभाजी महाराज यांची प्रतिमा धर्मवीर बनवून मुस्लिमांचे विरोधक अशी बनवली. परंतु इतिहासाची पाने चाळली असता छत्रपती संभाजी महाराज यांनी कोणी मुस्लिम आहे म्हणून त्याच्यावर अन्याय केला नाही किंवा कोणी हिंदु आहे म्हणून चुकिला माफ केले नाही. याचाच अर्थ छत्रपती संभाजी महाराज हे न्यायवादी कर्मवादी होते. स्वराज्याच्या विरोधात जो कोणी जाईल त्याला धडा शिकवण्याचे काम छत्रपती संभाजी महाराज यांनी केले. छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार व कार्य तरुणांमध्ये पेरले तर तरुणांवर चांगले संस्कार पडतील. आणि तरुणांवर चांगले संस्कार पडू नये, तरुणांना छत्रपती संभाजी महाराज कळूच नये म्हणून जाती धर्माचा आधार घेतला जातो.



संभाजी महाराज हे मुसलमानां विरोधात नव्हते तर मुघलांच्या चुकिच्या व अन्याय अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधात हा लढा होता. छत्रपती संभाजी महाराज हे मुघल, सिद्दी व पोर्तुगीज यांच्या विरोधात लढले परंतु इतिहासात फक्त संभाजी महाराज यांचा संघर्ष मुघलाशी म्हणजेच मुस्लिमांशी दाखवला हा ऐतिहासिक बदमाशपणा आहे. कारण मुगल मुस्लिम होते म्हणून विरोध नव्हता तर परकीय होते आणि त्यांच्या काळात अन्याय अत्याचार होत होते म्हणून विरोध होता ही गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे. आता तर व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वाले एवढे विद्वान झाले की छत्रपतींचे नाव घेऊन फक्त धार्मिक द्वेष करत आहेत आणि राजकीय लोकांची झोळी भरून देत आहेत. व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या तज्ञांचे मँसेज वाचले तर असे लक्षात येते की छत्रपतींनी फक्त मुस्लिम द्वेष करून मुसलमानांना मारले दुसरे काहीच काम केले नाही. परंत चुकिची माहिती फसरवताना खरी माहिती बाजूला जाते आणि चुकीची माहिती वारंवार ऐकल्याने चुकीच्या गोष्टींना सत्य समजले जाते. चुकीचा व घोडसळ इतिहास सांगितल्याने छत्रपतींचा अवमान होतो याचे गांभीर्य देखील कोणाला नाही. छत्रपती संभाजी महाराज यांचे संपुर्ण आयुष्य तिस बत्तीस वर्षाचे. एवढ्या काळात त्यांनी एकशे विस पेक्षा जास्त लढाया जिंकल्या त्याही एकही लढाईत न हरता. चार ग्रंथ लिहले तेही संस्कृत भाषेत, दहा पेक्षा जास्त भाषा त्यांना अवगत होत्या. या कार्यावर विचारावर अनेक लोक बोलणे टाळतात. आजही तिन बत्तीस वर्षाच्या तरूणाला विचारले की तुला आयुष्यात काय करायचे तर त्याच्या कडे उत्तर नसते. परंतु छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या संपूर्ण आयुष्य ते करून दाखवले. छत्रपती संभाजी महाराज यांची व छत्रपती शिवाजी महाराष्ट्र यांची प्रतिमा फक्त धर्माभोवती आणि मुस्लिम विरोधक दाखवून त्यांच्या कर्मावर पडदा टाकणारे बदमाश व बदमाश लोकांच्या चुकीच्या गोष्टी सत्य माणणारे बुद्धीचा वापर न करणारे लोक यांच्या बुद्धीची किव येते. कारण जर छत्रपती यांनी धर्मासाठी काम केले असते तर अण्णाजी दत्तो आणि चिटणीस बाळाजी, आवजी, सोमाजी दत्तो, हिरोजी यांना हत्तीच्या पायी कशाला दिले असते? वरील लोक मुसलमान होते का? आणि छत्रपती जर धर्मासाठी लढत होते तर कृष्णा कुलकर्णी यांनी छत्रपती शिवाजी महाराष्ट्र यांच्या वर वार कोणत्या कारणाने केला असेल. छत्रपती संभाजी महाराज खरचं धर्मासाठी लढले तर संभाजी महाराजांवर वार करणाऱ्या कृष्णा कुळकर्णी चे धर्मविरोधी म्हणून दहण का केले जात नाही. मुघलांचा धर्म मुस्लिम म्हणून समस्त मुसलमानांना दोष दिला जातो तर हाच नियम कृष्णा कुळकर्णी ला लागु का होत नाही? इतिहासातील बदमाशी व व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या तज्ञांपासून सावध होऊन आपण छत्रपती संभाजी महाराज यांचे वास्तव कार्य व चरित्र बघितले तर छत्रपती संभाजी महाराज हे कुशल संघटक होते, शुरविर योद्धा होते, बहुभाषिक विचारवंत होते, थोरग्रंथकार होते, अन्याय अत्याचार खपवून न घेणारे मानवतावादी होते, जात धर्म न बघता चुक बघून शिक्षा करणारे न्यायवादी होते, वडीलांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी वडीलांसोबत दगाबाजी करणाऱ्यांना स्वकियांना हत्तीच्या पायी देणारे कठोर शासक होते. हे सर्वगुणसंपन्न छत्रपती संभाजी महाराज असताना काही धुर्त लोकांनी लेखणीच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र हनन केले. जर छत्रपती संभाजी महाराज धर्मासाठी लढले तर चरित्र हनन करणारे बदमाश धर्मविरोधी म्हणून घोषीत का केले जात नाही. धर्मवीर संभाजी राजे म्हणताना संभाजी राजेंना पकडून देणाऱ्या शिर्केंना धर्मविरोधी म्हणून का घोषित केले नसेल? हा संशोधनाचा विषय होय. डोळसपणे विचार केला तर संभाजी राजे हे समतावादी, मानवतावादी असुन शुर पराक्रमी होते. जे हजारो वर्षांपासून स्वतःलाच श्रेष्ठ समजून इतरांना तुच्छ समजत होते त्यांच्या जिव्हारी लागलेला राजा म्हणजे छत्रपती संभाजी महाराज. ज्यांनी विषमता, शोषण व भेदभाव याच्या आधारे समाजाची रचना केली तेथे छत्रपती संभाजी महाराज यांनी वडीलांचा वारसा चालवून समाता बंधुता व न्याय जनतेला दिला हे निच लोकांना पटणारे नव्हते. म्हणून त्यांनी लेखणीच्या माध्यमातून संभाजी महाराज यांचे चुकीचे वर्णन करून शुरता दाबण्याचा प्रयत्न केला. परंतु काही निरपेक्ष इतिहासकाराच्या माध्यमातून सत्य इतिहास समोर आणुन छत्रपती संभाजी महाराज यांचे खरे कार्य प्रकाशात आनले. जयंती दिनी आपले अभिवादन सत्कामी लागावे असे वाटत असेल तर छत्रपती संभाजी महाराज यांचा सत्य इतिहास लोकांना सांगुन छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेऊन कोणतीही दंगल किंवा द्वेष निर्माण होऊ नाही. तरच छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन केल्याचे सार्थक होईल. छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या मंगलमय सदिच्छा..

******

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणारे ओबीसी बद्दल समाज जागृती संदर्भात कुठं हरवतात!

विश्वकर्मीय राज्यस्तरीय सुतार समाज हा संवैधानिक दृष्टीने ओबीसी प्रवर्गातीलच एक मोठा ओबीसी घटक आहे.संपूर्ण आदर्श विश्वकर्मीय राज्यस्तरीय सुतार समाज आपल्याच कब्जात आहे असं समजणाऱ्या,समाजात स्वतःलाच विद्वान,हुशार,दिग्गज, धुरंधर,मातब्बर समाज नेतृत्व समजणाऱ्या,महान क्रांतिकारक,विचारवंत,मुरब्बी,अनुभवी,कर्तबगार,कर्तृत्ववान,कार्यसम्राट,समाज कैवारी,समाज तारणहार,समाज जाणकार,समाज अभ्यासक,समाज प्रमुख समजणाऱ्या विश्वकर्मीय सुतार समाज नेत्यांना आणि धडाकेबाज युवक समाज नेत्यांना तसेच समाजात समाज नेतेगिरीचं गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असलेल्या सर्वच इच्छुकांना विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातीलच एक मोठा ओबीसी घटक आहे याचा विसर मात्र पडू नये.

संविधान निर्माते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कल्पक दूरदृष्टीने ओबीसी प्रवर्गातील जनतेसाठी संविधानात विशिष्ट कलमे निर्माण केलेली आहेत त्याचा योग्य पध्दतीने उपयोग विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात समाज नेतेगिरी करणारे समाजहितासाठी समाज प्रबोधन करण्यासाठी किती टक्के करतात याचा सुद्धा चिकित्सक पध्दतीने विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाने जागरूक होऊन विचार करण्याची नितांत गरज आहे. विश्वकर्मीय सुतार समाजात समाज नेतेगिरी करणारे स्वयंघोषित तथाकथित समाज नेते ओबीसी बद्दल समाज जागृती संदर्भात कुठं हरवतात हा सामाजिक दृष्टीने महत्वाचा प्रश्न समाजातील प्रत्येक समाज बांधवांनी, सुशिक्षित,उच्चशिक्षित,चिकित्सक जागृत समाज बांधवांनी,बुद्धिप्रामाण्यवादी,बुद्धिवान विश्वकर्मीय सुतार समाज बांधवांनी समाजात समाज नेतेगिरी करणाऱ्या सर्वच समाज नेत्यांना जबाबदारी पूर्वकच विचारला पाहिजे.

विश्वकर्मीय सुतार समाजातील प्रत्येक समाज बांधव,सर्वच वयोगटातील समाज बांधव,महिला वर्ग विश्वकर्मीय ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील महत्वाचा घटक असतो.सामाजिक क्षेत्रातील तळागाळातील,उपेक्षित,खेड्यातील,कष्टकरी,कारागीर, सुशिक्षित बेरोजगार युवक,शेवटच्या घटकांचा समावेश असलेल्या सर्वच समाज घटकांना एकत्रित करून संपूर्ण राज्यस्तरीय विश्वकर्मीय ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्र म्हणता येईल.विश्वकर्मीय राज्यस्तरीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक असतांना सुद्धा ओबीसी बद्दल समाज प्रबोधनात्मक दृष्टीने विश्वकर्मीय सुतार समाजात समाज नेतेगिरी करणारे तथाकथित स्वयंघोषित समाज नेत्यांमध्ये ओबीसी बद्दल,संविधान,जनगणना,आरक्षण,सत्ता संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी, संवैधानिक हक्क अधिकार इत्यादी संदर्भात राज्यभरात प्रत्येक जिल्ह्यात ठिकठिकाणी लाखोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित करून राज्यस्तरीय विश्वकर्मीय सुतार समाजात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे भव्यदिव्य स्वरूपाचे आयोजन केले जात नाही.

विश्वकर्मीय सुतार समाजात समाज जागृती करण्यासाठी,समाजात विविध विषयांवर समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी लागणारी तळमळ,आत्मीयता, जिव्हाळा, कळवळा,जिद्दीने आणि पोटतिडकीने,समाज इमानदारीने,प्रामाणिकपणे काम करण्याची आवड,ओबीसी,संविधाना बद्दल अभ्यासपूर्ण ज्ञानाचे ज्ञान भांडार खुला करण्यासाठी,तर्कशुद्ध मुद्देसूद संवैधानिक पध्दतीने समाजाला जागरूक करण्यासाठी, समाजात विविध विषयांवर समाज प्रबोधन करण्यासाठी आवश्यक लागणारी सचोटी, आणि चिकाटी,समाजाला विविध विषयांवर जागृत करण्यासाठी लागणारी वैचारिक परिपक्वता आणि सर्वगुणसंपन्न असणारी विशिष्ट गुणवत्ता इत्यादी बाबींचा प्रकर्षाने अभाव जाणवतो.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील एकही बहाद्दर कर्तबगार समाज नेतृत्व तर्कशुद्ध मुद्देसूद संवैधानिक पध्दतीने सविस्तर खुलासा करण्यासाठी पुढाकार घेणार नाहीत कारण या संदर्भात समाजात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन समाज नेत्यांनी कधीही केलेले नाही मग तर्कशुद्ध मुद्देसूद संवैधानिक पध्दतीने खुलासा करतील कसा काय या निमित्ताने विहिरीत नसेल तर पोहऱ्यात येईल कुठून या म्हणीची आठवण आल्या शिवाय राहात नाही. ओबीसी बद्दल समाज जागृती करणे हा विषय ओबीसी प्रवर्गातील बहुजन समाजाला तारणारा आणि महत्वाचा विषय समजला जातो.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय सुतार समाजात समाज नेतेगिरी करणाऱ्या समाज अभ्यासक असणाऱ्या विद्वान हुशार,बुद्धिवान,बुद्धिप्रामाण्य वादी,समाज जाणकार, समाज कैवारी,समाज तारणहार,समाज प्रमुख समजणाऱ्या,कर्तबगार, कर्तृत्ववान,कार्यसम्राट,समाज भूषण,समाजरत्न असणाऱ्या सर्वच समाज नेत्यांच्या सामाजिक क्षेत्रातील अभ्यासक्रमातील पाठ्यपुस्तकात हा महत्वाचा विषय आहे किंवा, नाही विशेषतः समाजात समाज नेतेगिरी करणाऱ्या तथाकथित स्वयंघोषित समाज नेत्यांच्या दृष्टीने हा विषय महत्वाचा आहे किंवा,नाही या विषयाकडे संबंधित समाज नेतेमंडळी गांभीर्याने बघतात कि,नाही विश्वकर्मीय सुतार समाज नेत्यांना याचे गांभीर्य कळते का नाही हाच मोठा गहन प्रश्न उपस्थित होतो.विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात ओबीसी संदर्भात समाज जागृती करण्यासाठी समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम,समाज जागृती महामेळाव्याचे भव्यदिव्य स्वरूपाचे आयोजन केले जात नाही परिणामी विश्वकर्मीत सुतार समाज ओबीसी बद्दल समाज जागृती संदर्भात अनभिज्ञ राहतो.

विश्वकर्मीय सुतार समाजात गेली अनेक वर्षांपासून समाजकार्य करण्याचा गवगवा केला जाईल परंतु,समाजात ओबीसी बद्दल जनगणना,संविधान,आरक्षण,सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी या व्यतिरिक्त तळागाळातील उपेक्षित खेड्यातील, कष्टकरी,कारागीर,सुशिक्षित बेरोजगार युवकांना दरडोई कर्तृत्ववान समाज नेतृत्वाखाली राज्यातील खेडोपाडी कानाकोपऱ्यात गावागावात वाडीवस्तीमध्ये कोणी किती किती हजार उद्योग व्यवसाय उभारणी करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करून समाजात आर्थिक सुबत्ता निर्माण करणे,समाज सुजलाम सुफलाम करणे अर्थात सामाजिक सर्वांगीण विकास करणे इत्यादी समाज विकासक विषयावर कोणी किती वेळा समाजात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करून कोणाच्या धडाकेबाज समाज नेतृत्वाखाली राज्यभरात ठिकठिकाणी लाखोंच्या संख्येने समाज एकत्रित करून विश्वकर्मीय सुतार समाजात खऱ्या अर्थाने समाज प्रबोधन केले आहे याचा सत्यावर आधारित पुराव्यानिशी खुलासा कोणालाही करता येणार नाही

एरव्ही इतर वेळी राज्यस्तरीय बुद्धिप्रामाण्यवादी आदर्श विश्वकर्मीय सुतार समाजातील सामाजिक क्षेत्रातील विशेष आमंत्रित पाहुणे,राज्यातील विविध विभागातील विविध सामाजिक संघटनांचे,संस्थांचे कर्तृत्ववान जबाबदार प्रतिनिधी, राज्यातील विविध जिल्ह्यातील कर्तबगार प्रतिनिधी,सामाजिक क्षेत्रातील कर्तबगार आणि जबाबदार पदाधिकारी सामाजिक मंचावर प्रमुख उपस्थिती,प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले बुद्धिवान,विद्वान आणि हुशार समजले जाणारे सामाजिक क्षेत्रातील भव्यदिव्य व्यासपीठावरून समाजाला आपल्या अभ्यासपूर्ण,ज्ञानवर्धक,कौशल्यपूर्ण आणि करारी बाण्याच्या तडाखेबंद भाषणबाजीच्या माध्यमातून वैचारिक दृष्टीने मार्गदर्शन करण्यासाठी समोर उपस्थित जमलेल्या समुदायाला मंत्रमुग्ध करण्यासाठी समाजातील विविध ठिकाणच्या विविध सामाजिक मंचावर अशा मान्यवरांची उपस्थिती लाभली म्हणजे कार्यक्रमाची शोभा वाढत असावी असा संदेश सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्याऱ्या आयोजकांकडून विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात कळत न कळत देण्याचा प्रयत्न होत असावा.

सामाजिक क्षेत्रातील कार्यक्रमात,सामाजिक मंचावर मानसन्मान प्राप्त करणारे प्रतिष्ठित मान्यवर धडाकेबाज कर्तृत्ववान कर्तबगार कार्यसम्राट समाज नेते ओबीसी, संविधान,जनगणना,आरक्षण,सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी प्राप्त करण्यासाठी समाजात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करतांना दिसत नाहीत हे समाजाला न समजणारे आणि न उमजणारेच न सुटणारे एक कोडं म्हणता येईल. प्रत्येक सामाजिक संघटनेची विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक कार्याची प्रसिद्धी करण्यासाठी जबाबदार प्रसिद्धी प्रमुख अथवा विद्वान आणि हुशार तसेच सर्वगुणसंपन्न बुद्धिवान अनुभवी प्रवक्ते पदाची सुद्धा संबंधित संघटना नेमणूक करतात प्रसिद्धी प्रमुख आणि प्रवक्ता संबंधित संघटनांचा सामाजिक आत्मा समजला जातो शिवाय प्रत्येक संघटना आणि कर्तृत्ववान समाज नेत्यांच्या दिमतीला लाखोंच्या संख्येने कर्तबगार कर्तृत्ववान कार्यसम्राट सामाजिक कार्यात तरबेज असलेल्या धडाकेबाज कार्यकर्त्यांचा ताफा सुद्धा असतो.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात स्वतःला समाज नेतृत्व समजणाऱ्या कोणत्या कर्तबगार अनुभवी मातब्बर दिग्गज समाज नेत्यांनी आणि स्वतःला धडाकेबाज युवक नेतृत्व समजणाऱ्या समाज नेत्यांनी आपल्या नेतृत्वाखाली राज्यातील ३६ जिल्ह्यापैकी किती जिल्ह्यात किती ठिकाणी किती किती लाख विश्वकर्मीय सुतार समाज बांधवांना एकत्रित करून ओबीसी,संविधान,जनगणना,आरक्षण सत्ता संपत्ती ज्ञान आणि राजकीय हिस्सेदारी संदर्भात आपल्या अभ्यासपूर्ण कौशल्यपूर्ण भाषणबाजीने आपल्या अफाट ज्ञानाचा ज्ञान भांडार खुला करून आपापल्या धडाकेबाज समाज नेतृत्वाखाली एकत्रित केलेल्या अर्थात जमलेल्या लाखोंच्या समाज समुदायाला मंत्रमुग्ध केलेले आहे आणि समाजात या संदर्भात समाज जागृती निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे याची पुराव्यानिशी माहिती कोणालाही जाहीर करता येणार नाही तरी सुद्धा समाजात मोठ्या ऐटीत मोठया थाटात आणि दिमाखात समाज नेतेगिरी चालत असेल तर निश्चितच हि बाब बुद्धिवान विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाला अचंबित करणारी ठरेल.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्र किती टक्के समाज बांधवांना समजते, उमजते आणि समाज किती टक्के जागृत आहे या प्रश्नाची उकल कोणालाही करता येणार नाही हिच सत्य परिस्थिती समाजात असतांना विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात समाज नेता नेतृत्व या प्रचंड प्रतिष्ठित शब्दाचा जन्म कोणी आणि कशासाठी केलेला आहे याची सविस्तर माहिती आणि तर्कशुद्ध मुद्देसूद संवैधानिक पध्दतीने खुलासा कोणालाही करता येणार नाही फक्त स्वतःच्या नावासाठी आणि स्वतःच्या मोठेपणासाठी समाज नेतृत्व हि सन्मानजनक उपाधी जोडणे निर्लज्जपणा म्हणता येईल अशा प्रकाराला निव्वळ हास्यास्पद आणि संपूर्ण विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची दिशाभूल ठरेल.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात कोणत्याही स्वयंघोषित समाज नेतृत्वाखाली कधीही ओबीसी,संविधान,जनगणना,आरक्षण,सत्ता,संपत्ती,ज्ञान,राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज जागृती कार्यक्रम आयोजित करून लाखोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित करण्याची लायकी,क्षमता, पात्रता,प्रभाव,प्राबल्य,प्रभुत्व नसतांना स्वतःला समाज नेतृत्व हि मानाची सन्मानजनक उपाधी जोडणे म्हणजे उतावीळ नवरा गुडघ्याला बाशिंग म्हणता येईल.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात राज्यस्तरीय नामकरणाचा गवगवा करणाऱ्या सामाजिक संघटना जवळपास २०० च्या आसपास असतील राज्यभरात ५० लाख लोकसंख्या ३६ जिल्हे आणि जवळपास ३६० तालुक्यात विस्तारित असलेला राज्यस्तरीय विश्वकर्मीय सुतार समाज आहे आणि विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहे.महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ओबीसीं साठी संविधानात काही विशिष्ट कलमे निर्माण केलेली आहेत त्या कलमांचा ओबीसी सुतार समाजात अभ्यासपूर्ण पध्दतीने प्रसार व प्रचार समाज जागृती निर्माण करण्याची नैतिक जबाबदारी समाजातील स्वतःला समाज नेतृत्व म्हणवुन घेणाऱ्या सर्वंच समाज नेत्यांची आहे हे मी जबाबदारी पुर्वक लिहितो आणि तर्कशुद्ध मुद्देसूद संवैधानिक पध्दतीने खुलासा सुद्धा करु शकतो.

अशा भल्यामोठ्या राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात सामाजिक कार्य करण्यासाठी सामाजिक क्षेत्रात असंख्य सामाजिक संघटना अस्तित्वात आहेत आणि या सर्वंच संघटनांच्या कार्यकारिणीवर नावाजलेले नामवंत नामांकित तसेच कर्तृत्ववान कर्तबगार कार्यसम्राट सामाजिक जाणिव आणि सामाजिक कर्तव्याचे भान असणाऱ्या विद्वान हुशार बुद्धिवान जबाबदार पदाधिकारी वर्गाची निवड करण्यात आलेली आहे.समाजात याच संघटनांच्या माध्यमातुन अनेक जबाबदार सामाजिक जाणिव सामाजिक भान आणि सामाजिक कर्तव्य याची जाणिव असलेल्या अशा कर्तबगार धडाकेबाज कर्तृत्ववान व्यक्ती समाज नेतृत्व म्हणुन उदयास येतात किंवा,समाजात समाज नेतृत्व करण्यासाठी पुढे येतात नंतर विश्वकर्मीय सुतार समाजात समाज नेतृत्व आणि धडाकेबाज युवा नेतृत्व म्हणुन मोठया दिमाखात मिरवतात आणि सामाजिक कार्यक्रमात, सामाजिक मंचावर समाजाचे समाज नेतृत्व म्हणून मानसन्मान करून घेतात.



ओबीसी समाजात ओबीसी जागृती मेळाव्यात ओबीसी सुतार समाज बांधवांचा सुतार समाजातील दिग्गज समाज नेत्यांच्या नेतृत्वाखाली सहभाग किती टक्के आहे याबाबत खरी आकडेवारी प्रसिद्ध करा एक वेळ आजमावून तर बघाच.ओबीसी सुतार समाजात स्वतःलाच कर्तृत्ववान कर्तबगार कार्यसम्राट समाज नेतृत्व समजणाऱ्या तथाकथित स्वयंघोषित समाज नेत्यांनी ओबीसी सुतार समाजात प्रचंड तसेच निरपेक्ष निःस्वार्थ समाजहितासाठी आणि समाजोपयोगी सामाजिक सर्वांगीण विकासात्मक समाज महात्मा सुतार समाज नेतृत्व समजणाऱ्या धडाकेबाज दिग्गज विश्वकर्मीय सुतार समाज नेतृत्वाखाली स्पेशल ओबीसी,संविधान,जनगणना,आरक्षण,सत्ता संपत्ती ज्ञान तसेच राजकीय हिस्सेदारी इत्यादी वैचारिक दृष्टीने समाजात सुतार समाज जागृती मेळाव्याचे,मोर्चाचे,आंदोलनाचे ओबीसी म्हणूनच आयोजन करा आणि ओबीसी सुतार समाज नेत्यांनीच आपापल्या धडाकेबाज नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करून उपस्थित जमलेल्या लाखोंच्या समाज समुदायाला आपापल्या वैचारिक ज्ञानाचा ज्ञान भांडार खुला करून समाजाला मंत्रमुग्ध करा.

इतरांच्या सोबत फोटोबाजी करून ओबीसी सुतार नेते,नेतृत्व आणी ओबीसी सुतार युवा नेतृत्व सिद्ध होणार नाही स्पेशल ओबीसी सुतार राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करा आम्ही ओबीसी सुतार आणी आमचे ओबीसी सुतार समाज नेतृत्व आणी ओबीसी सुतार कर्तृत्ववान युवा नेतृत्व मान्यवर महोदय स्पेशल ओबीसी सुतार समाजाचा ओबीसी सुतार राज्यस्तरीय ओबीसी सुतार मेळावा राज्यस्तरीय विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात आयोजित करा त्यासाठी समाजात आपापल्या धडाकेबाज,विद्वान आणी हुशार,दिग्गज आणी धुरंधर नेतृत्व तडफदार मातब्बर ओबीसी सुतार युवा नेतृत्व अधिपत्या खाली सामाजिक ओबीसी सुतार समाजाला ओबीसी सुतार समाज राज्यस्तरीय ओबीसी मेळाव्यात हजारोंच्या नव्हे लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती करा,असे जाहीर आवाहनच करा,त्या बाबतीतच जाहीर प्रसिद्धी पत्रक काढा आणी खरी आकडेवारी ओबीसी सुतार समाज बांधवांची जमिनीवरील उपस्थित खरी आकडेवारी मात्र प्रसिद्ध करा.

यासाठीच हा विषय आवर्जुन सर्वंच प्रकारच्या सोशल मीडियावर जाहीर प्रसिद्ध करा प्रचार व प्रसार करण्यासाठी आपापले धडाकेबाज प्रसिद्धी प्रमुखांना योग्य नियोजन तयार करून द्या आणखी आपापले लाखो निष्ठावंत सहकारी कार्यकर्त्यांना नियोजन आराखडा तयार करून द्या शिवाय गरज भासल्यास पत्रकार परिषद घेऊन तसे समाज माध्यमातून सगळीकडे समाज जाहीर करा. आम्ही ओबीसी सुतार समाज आहोत ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहोत.ओबीसी सुतार समाजातील ओबीसी नेत्यांनी,ओबीसी सुतार नेता आणी ओबीसी सुतार युवा नेतृत्व म्हणून घेणाऱ्यांनी इतर काही ओबीसी नेत्यां सोबत ओबीसी कार्यक्रमात फोटोबाजी न करता स्पेशल ओबीसी सुतार समाजाचा राज्यव्यापी ओबीसी सुतार मेळाव्यात आपापल्या नेतृत्वाखाली किती हजारोंच्या संख्येने,किती लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधव ओबीसी राज्यस्तरीय आंदोलनात आवर्जुन सहभागी होतात आणि कोणाच्या नेतृत्वाखाली किती ओबीसी सुतार समाज एकत्र गोळा होऊ शकतो याची परीक्षा घ्यावी आणि खरी आकडेवारी प्रसिद्ध करा इतर ओबीसी सोबत आपला आदर्श ओबीसी सुतार सहभाग किती आहे यासाठी हा ओबीसी सुतार लेख इतरांच्याच सोबत फोटोबाजी करून काय साध्य होणार हा एक ओबीसी सुतार प्रश्न कायम आहे.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात आपली प्रतिष्ठा प्राबल्य प्रभाव प्रभुत्व दबदबा राज्यभरात ठिकठिकाणी जमिनीवर सिद्ध करा सामाजिक ताकद दाखवा,आपला जलवा आणि ओबीसी सुतार करिष्मा दाखवा,आपलं ओबीसी सुतार वजन सिद्ध करण्यासाठी प्रयत्न करा.यापूर्वी अनेक ओबीसी सुतार लेख लिहिले आहेत. आम्ही ओबीसी सुतार आणि आमचे ओबीसी सुतार नेतृत्व तसेच धडाकेबाज ओबीसी सुतार युवक नेतृत्व एक वेळ जमिनीवर अजमावून तर बघा तसेच समाजाला समजण्यासाठी संबंधित कार्यक्रमातील उपस्थित समाज बांधवांची खरी आकडेवारी प्रसिद्ध करा. विश्वकर्मीय सुतार समाज ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक म्हणून ओबीसी समाजात ओबीसी जागृती मेळाव्यात आरक्षण,संविधान या विषयावर समाज जागृती मेळाव्यात ओबीसी सुतार समाजाचा सहभाग किती टक्के याची राज्यभरात ठिकठिकाणी जमिनीवर परीक्षा घ्या अन्यथा विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात समाज नेतेगिरी करणारे तथाकथित स्वयंघोषित विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज नेते ओबीसी बद्दल समाज जागृती संदर्भात कुठं हरवतात हा महत्वाचा सामाजिक प्रश्न मात्र अनुत्तरितच राहील आणि विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज ओबीसी जागृती संदर्भात अंधारातच राहील,अनभिज्ञ राहील.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात समाज नेतेगिरी करण्यासाठी प्रचंड उत्साहात उतावीळ झालेले,समाज नेतेगिरीचं गुडघ्याला बाशिंग बांधलेले,समाज नेतेगिरीचा मानाचा मुकुट परिधान करण्यासाठी आग्रही असणारे,समाज नेतेगिरीचे प्रबळ दावेदार,आग्रही आणि इच्छुक असणाऱ्या सर्वच तथाकथित स्वयंघोषित विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज नेत्यांनी याची जाणिव ठेवावी तरच विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात समाज नेतेगिरी करण्यास आणि अभिनंदनास सुद्धा लायक समजले जाईल!

*********

जय ओबीसी जय संविधान जय विश्वकर्मा
प्रमोद सुर्यवंशी ८६०५५६९५२१.
चिखली मातृतीर्थ बुलडाणा.

# एक व्हा, नेक व्हा आणि स्वाभिमानाने एक नेता, एक पक्ष, एक झेंडा हाती घ्या.

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत बुद्ध फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, ७ व ८ मे १९३२ ला नागपूर येथील अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या अधिवेशनात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, अस्पृश्य समाजाच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. त्या विधानाची वर्तमान प्रासंगिकता आणि संदर्भ लक्षात घेऊन सुरूवातीला बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या अनुषंगाने संघर्ष केला असला तरी पुढे जाऊन मानवतावादी दृष्टीकोनातून या देशातील द्रविड व नाग लोक एकच असल्याचे स्पष्ट करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लढा दिला आहे. याची जाणीव ठेवून त्या संदेशाच्या ९२ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? आपली त्यात भागीदारी किती? यावर विचारमंथन व्हावे म्हणून नाग लोकांच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (-खछ-) आईनाच्या संयुक्त विद्यमाने ४६ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ५ मे २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन बहुजन समाज भुषण पुरस्कार प्राप्त उद्धव बनसोडे म्हणाले की, साधा विजेचा दर ठरविण्याचा अधिकार आपणांस असुन सुद्धा टाळूवरील लोणी खाणारे ठरवीत आहेत. न्यायालयातील काही न्यायधीश सुद्धा पूर्वग्रहदूषित भावनेने वागत आहेत. मूलनिवासीयांचे हक्क अधिकार नाकारले जात आहेत. आंबेडकराईट नसलेले प्रतिनिधी निवडल्याने आपली वाताहात झाली आहे. आपली माणसे मोठी झाली की समाजाला विसरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, उच्चाधिका-यांनी आपण ज्या झोपडपट्टीतून आलो, त्या झोपडपट्टीतून लाल दिव्याची गाडी फिरविली पाहिजे. जेणेकरून त्या झोपडपट्टीत राहणा-या जनतेला प्रेरणा मिळेल. आपल्या जनतेवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला आळा घालण्यासाठी सत्तेच्या चाब्या आपल्या ताब्यात असायला हव्यात. करिता सत्तेचे गणित समजून घेऊन योग्य प्रतिनिधी निवडले पाहिजेत.

या प्रसंगी धनराज गोंडाणे म्हणाले की, भारताचे संविधान आणि धम्म एकच आहे. करिता त्याची जोपासना करण्यासाठी धम्म पालनाने शीलवान, गुणवान मानसे निर्माण होणे आवश्यक आहे. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व विकसित केले पाहिजेत. सुशिक्षितांनी मागे वळून सिंहावलोकन केले पाहिजे. राजू काटोले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेसमोर कोलंबिया विश्वविद्यालयात ढ्ढह्य ड्ढलेश्र`ष घपुेश्रशवसश अर्थात ज्ञानाचे प्रतिक असे लिहिले आहे. ज्यामुळे बराक ओबामा सारख्या महनीय व्यक्ती पुढे आल्यात. महादेव डांबरे म्हणाले की नाग लोकांच्या हाती सत्तेची सुत्रे आल्याशिवाय आपला विकास होणार नाही. भारतातील प्रत्येक नागरिकांच्या अंगी भारतीयता भिनली पाहिजे. काय आपण मूर्ख, नालायक आहोत? ज्यामुळे ४ टक्के शेटजी, भटजी, लाटजी आपल्यावर राज्य करतात. करिता ८५ टक्के मूलनिवासी बहुजन समाजाचे ऐक्य झाल्यावर आपली सत्ता असेल. म्हणून एक व्हा, नेक व्हा आणि एक पक्ष, एक नेता, एक झेंडा हाती घ्या. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, गिळलेला घास आणि घेतलेला श्वास हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच मिळाला आहे. याची जाणीव ठेवून लढला नाहीस तरी चालेल पण विकला जाऊ नकोस, ही भूमिका पार पाडावी लागेल. सत्ता हेच सर्वस्व नाही तर सामाजिक क्रांती नंतरच राजकीय क्रांती होऊ शकेल. याची जाणीव ठेवून मार्गक्रमण करावे लागेल. प्रा. मंगला झिने म्हणाल्या की, उच्चभ्रू वसाहतीतील लोकांचा सुद्धा सामाजिक कार्यात सहभाग नसतो. आंबेडकराईट व्हायला कुणी तयार नाहीत? निवडणूकीत उमेदवाराचे चारित्र्य, गुणवत्ता तपासून निवड केली पाहिजे. अन्यथा नोटाचा वापर करावा. संघदीप रोडगे म्हणाले की, केवळ राजकीय सुत्रे हाती आल्याने समस्या सुटतील काय? ब्राह्मण समाजातील लोक राजकीय सुत्रे इतरांच्या हातात देऊन राज्यकारभार स्वतः बघतात. इतिहासातून धडा घेतला नाही तर इतिहास आपणास धडा शिकवेल. सत्तेत येण्यासाठी संघटीतपणे शिस्त पाळली पाहिजे. करिता केवळ रक्तातील नव्हे! तर वैचारिक निष्ठावान लोकांची आवश्यकता आहे. नाग लोक हे तुटलेले आहेत.



प्रमुख वक्ते एड. विजय सुरडकर म्हणाले की, राष्ट्रपती आदिवासी, प्रधानमंत्री ओबीसी ही माणसे आपली असली तरी त्यांचे मेंदू मात्र आपल्या विचारांचे नाहीत. ज्यामुळे देशाच्या प्रथम नागरिक असलेल्या राष्ट्रपतींना सुद्धा उद्घाटनाला बोलावले जात नाहीत. याचे मूळ शोधून सुगरणीचा घरटा तैयार करावा लागेल. शेजारच्या माणसाबरोबर जयभीम बोलायला लाज वाटणारा समाज तैयार होत आहे, ही अधोगती कडे जाणारी वाटचाल होय. सामाजिक व राजकीय चारित्र्य असलेल्या नेतृत्वाचा स्विकार केला पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ सप्टेंबर २९४४ ला मद्रास येथे शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा होय असे म्हटले होते. त्यापूर्वी ७ व ८ मे १९३२ ला नागपूर येथील अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या अधिवेशनात अस्पृश्य समाजाच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. असे म्हटले होते. त्या विधानाची वर्तमान प्रासंगिकता आणि सदर्भ लक्षात घेऊन सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी संघर्ष केला असला तरी पुढे जाऊन मानवतावादी दृष्टीकोनातून या देशातील द्रविड व नाग लोक एकच असल्याचे स्पष्ट करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लढा दिला आहे. याची पार्श्वभूमी लक्षात घेऊन नाग समुदायाच्या हाती राजकीय सुत्रे येणे फारच आवश्यक आहे. या विषयावर आज आपण वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन केले आहे. जेणेकरून समाजाची होत असलेली दुरावस्था आणि नेतृत्वात निर्माण झालेली निर्वात पोकळी याची जाणीव होऊ शकेल. समाजातील वसाहतीतील विहारात आपले योग्य प्रतिनिधी, अध्यक्ष, सचिव निवडण्यास सक्षम नसणारा समाज आपले योग्य प्रतिनिधी, आमदार, खासदार निवडून विधायिकेत कसे पाठविणार आहे? अशी भिषण परिस्थिती समाजात असल्याने हा विषय ऐरणीवर आणून चर्चा करने गत्यंतर झाले आहे. मागील महिन्यात फुले आंबेडकर जयंती देशभरात साजरी करण्यात आली. ज्यावर कुंभकर्णीय झोपेतून जागे होणाऱ्या हितचिंतकांनी भावनिकतेपोटी कोट्यवधी रुपयांचा आर्थिक चु-हाडा नाचगाणी आणि डी. जे. वर केला आहे. ज्या बळावर योग्य प्रतिनिधी निवडून आणण्यासाठी वैचारिक प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे आवश्यक होते. ते न केल्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ समजून घेण्याची प्रक्रिया मंदावली असल्याने नेतृत्वहीन समाजात नेतृत्व निर्माण करण्याचा वसा घेतल्याची वल्गना करणारे सुद्धा नेतृत्वहीन झाल्याची जाणीव होत आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे केवळ निवडणुक जिंकल्याने राजकीय पक्षाचे अस्तित्व कायम राहणार नाही तर जनतेला शिक्षित करून संघटीत होण्यासाठी संघर्ष करायला भाग पाडण्याची प्रक्रिया सातत्याने समाज जीवनात राबविली पाहिजे.

# साहित्याने माणसांच्या मुलभुत प्रश्नाविषयी बोलले पाहिजे : प्रा. सिताराम सावंत. उहेझरीं बनाळीत २४वे ग्रामीण साहित्य संमेलन उत्साहात संपन्न

## सावंत हीचा लेखसंग्रह प्रकाशित.

### साहित्य संसारासाठी दत्तक घ्या

जुन्या जाणत्या साहित्यिकांनी नवलेखकांना दत्तक घेण्याची गरज आहे हे सांगताना संमेलनाध्यक्ष प्रा. सिताराम सावंत म्हणाले की डॉ. श्रीकांत कोकरे आपण ऋतुजा सावंत हिला साहित्य संस्कार करण्यासाठी दत्तक घ्यावे. या त्यांच्या मागणीला डॉ. श्रीकांत कोकरे यांनीही होकार दिला.



जत / प्रतिनिधी :- साहित्यकरांनी समाजातील माणसाच्या भुके विषयी बोललं पाहिजे. अन्न ,वस्त्र ,निवारा या मूलभूत गरजा भागल्या की, जिवंत राहण्याची शाश्वती मिळते, माणसाला जगण्याची उमेद मिळते. त्यांचं जगणं सुंदर व उन्नत कसं होईल, याविषयी बोलायला व लिहायला काहीच हरकत नाही. म्हणून साहित्याने मूलभूत गरजा विषयी बोलले पाहिजे असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक तथा संमेलनाध्यक्ष प्रा. सिताराम सावंत यांनी केले.

बनाळी (ता.जत) येथे बनशंकरी मंदिर येथे मराठी साहित्य सेवा मंच व चंद्रकांत सावंत परीवार यांच्या वतीने आयोजित चोविसाव्या साहित्य संमेलन प्रसंगी बोलत होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी लवकुमार मुळे यांनी केले तर स्वागत सुरेश सावंत यांनी केले सदरचे साहित्य संमेलन तीन सत्रात पार पडले. पहिल्या सत्रात साहित्य संमेलनाध्यक्षाचे भाषण व पुस्तक प्रकाशन झाले. नवोदित लेखिका ऋतुजा सावंत हिच्या हरवलेली आपुलकी या लेखसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. पुस्तकाचे परीक्षण करताना डॉ. श्रीकांत कोकरे म्हणाले की नवोदित लेखिका, साहित्यिक, कवी यांना प्रोत्साहित करण्याची गरज आहे. समाजाला बदलण्याची ताकद, परिवर्तनाची किमया या साहित्यामध्ये आहे. आपल्या अध्यक्षीय भाषणात सीताराम सावंत पुढे म्हणाले की साहित्याची मांडणी वर्तमानाकडून भविष्याकडे असावी. वर्तमानातून भूतकाळाकडे नसावी. पुराणात रमणारे साहित्य वाचलंही जाईल पण त्याचा सांधा आजच्या वर्तमाणाशी जुळला नसेल तर हाती काही लागणार नाही. साहित्य लोकशाहीवादी व माणूसकेंद्री असायला हवं. साहित्यात लोकशाही जपणं लेखकासाठी कठीण असलं तरी ते अवश्यक आहे. लेखकाला जात, धर्म, पंथ या पलीकडं पाहता आलं पाहिजे. आज जगण्याचा वेग प्रचंड वाढलेला आहे. प्रचंड स्पर्धा आहे संघर्ष आहे. कालचं तंत्रज्ञान आज कालबाहय होतंय. आजचं तंत्रज्ञाण लगेचंच उद्या कालबाहय होत आहे. त्याचबरोबर साहित्यिक म्हणवणाऱ्यानी स्वताला अपडेट ठेवल पाहिजे.

दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध कथाकथनकार जोतीराम फडतरे यांची शाळा तपासणी या कथेने सर्वांना खळखळून हसायला लावले. शिक्षण विभागातील वस्तुस्थिती विशद करत कथा व व्यथा सांगितल्या. या सत्राचे अध्यक्षपद अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष विजय रूपनूर यांनी भूषविले.

तिसऱ्या सत्रात ज्ञानेश डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली कवीसंमेलन पार पडले. यात अनेक कवींनी आपल्या कवितेतून अफलातून मैफिल रंगविल्या. जीवनाचं खरं मर्म हे कवितेतून शिकले पाहिजे व्यक्त झालं पाहिजे अशा भावना व्यक्त केल्या. कवी सुनिल जंवजाळ यांच्या खुमासदार सुत्रसंचलनाने रंगलेल्या कविसंमेलनात ज्ञानेश डोंगरे, रावसाहेब यादव, शिवाजी बंडगर, श्रीयोग कोकरे यांनी गेय कवितेतून सभागृहाला मंत्रमुग्ध केले. शिवाजी संकपाळ, दत्तात्रय शिंदे, मेघाताई पाटील, अनिता कोडग यांच्या मुक्तछंदात सादर झालेल्या कवितांनाही रसिकांनी दाद दिली.

यावेळी सरपंच लक्ष्मण सुर्वे, साहित्यिक मच्छिंद्र ऐनापुरे, माणिकराव कोडग, तुकाराम सन्नके, कुमार इंगळे, संतोष जगताप, रियाज अत्तार , सुरेश सावंत, पर्यावरण प्रेमी किरण इथापे, यांच्यासह लेखक ,कवी, साहित्यप्रेमी उपस्थित होते. आभार मोहन मानेपाटील, चंद्रकांत सावंत यांनी मानले.

# व्ही एस पँथर्स आयोजित सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा भिंतीपत्रकाचे विमोचन



लातूर :- लातूर येथील भालचंद्र ब्लड बँक येथे व्ही एस पँथर्स युवा संघटन आयोजित सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याच्या निमित्ताने संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकारी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते भिंती पत्रकाचे विमोचन करण्यात आले यावेळी माय फाउंडेशन चे अध्यक्ष अन्वर भाई शेख मुस्तफा शेख ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे जिल्हाध्यक्ष विशाल गायकवाड संपर्कप्रमुख आनंद जाधव मार्गदर्शक संतोष मांदळे रवी कुरील, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ शहराध्यक्ष असद भाई शेख कामगारागाडी जिल्हा उपाध्यक्ष गौस भाई शेख कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे युनूस शेख संतोष माने सर रेनापुर तालुकाध्यक्ष राज तरकसे औसा तालुकाध्यक्ष सुनील सातपुते शिरूर आनंतपाळ तालुकाध्यक्ष राहुल कांबळे जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड सह पदाधिकारी उपस्थित होते ....

# राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरूच; सिमेंट काँक्रिटला गेले तडे !

याच महामार्गावर कोठारी ते हिमायतनगर या महामार्गावर चिखली (बु)दरम्यान गोकुळनगर या वस्तीजवळ सिमेंट काँक्रिटच्या कामाला भेगा पडल्या आहेत. रस्ता फुटल्याचा अंदाज येत नसल्याने दुचाकीवरून प्रवास करणे धोक्याचे बनले आहे.

महामार्गावरून जाताना ठोकरा लागून दुचाकी पडू लागल्याचे बोलले जात आहे. असाच कोठारी ते धनोडा या राष्ट्रीय महामार्गावर कमठाला जवळ महामार्गाला मोठ्या भेगा पडल्या आहेत. वाहन चालवताना मोठा धोका संभवतो आहे.



किनवट . प्रतिनिधी. (शेख शौकत) किनवट कोठारी ते हिमायतनगर सरसम या राष्ट्रीय महामार्गावर १६१ किनवट ते चिखली (बु) दरम्यान गोकुळनगरजवळ सिमेंट काँक्रिट रस्त्याला मोठे तडे गेले आहे. महामार्गाला भेगा पडल्याने भरधाव वेगाने धावणाऱ्या दुचाकीचालकांसाठी हा रस्ता धोकादायक ठरत आहे. तडे गेलेल्या रस्त्याला धडकून मोटारसायकलचा अपघात होत आहे. महामार्गाच्या मधोमध कोठारी ते किनवट, माहूर, धनोडा या महामार्गावर कमठालानजीक गेले असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग होतो न होतो तर मेंटनेसला आल्याचे चित्र आहे नांदेड, भोकर, हिमायतनगर, किनवट, माहूर, धनोडा या राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ ए वर कोठारी ते सरसम हिमायतनगर असे सर्वप्रथम काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हाती घेतले. हिमायतनगर ते कोठारी महामार्गाची काम सरू असतानाच पुरती वाट लागली. कामाचे नियोजन योग्य नव्हते. कोठारी ते हिमायतनगर या महामार्गावर सर्वप्रथम सिमेंट बेड व सिमेंट काँक्रिटचे काम हाती घेतले. त्यानंतर पुलाचे काम हाती घेण्यात आले. आजही या महामार्गावर पुलाचे काम सरूच आहे. :दुचाकीवरून प्रवास करणे धोक्याचे!

# लातूर जिल्हा वकील मंडळ आयोजित विधी क्षेत्रातील स्पर्धा परीक्षा क्लासेसचे उद्घघाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री व्हि व्ही पाटील यांच्या हस्ते संपन्न



लातूर :- लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने प्रती वर्षा प्रमाणे याही वर्षी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जिल्हा न्यायाधीश, सहाय्यक सरकारी अभियोक्ता आदी विधी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी क्लासेस चे आयोजन करण्यात आले आहे . याचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्रन्यायाधीश श्री व्ही. व्ही. पाटील सर यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून ड. विशाल दीक्षित सर, लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड शरद इंगळे, उपाध्यक्ष ड. आनंद खांडेकर, उपाध्यक्ष ड. मनीषा दिव्ये पाटील, सचिव ड. प्रदीपसिंह गगणे, सहसचिव ड. नरेश कुलकर्णी, ड. तृप्ती इटकरी, ग्रंथालय सचिव ड.विजय साबळे, कोषाध्यक्ष ड.रोहित सोमवंशी, वुमन्स फेडरेशनच्या अध्यक्ष ड. जयश्री पाटील, अँड किरण चिंते, अँड राजेंद्र लातूरकर यांच्यासह मोठया संख्येने वकील बांधवांची उपस्थिती होती कार्यक्रमांचे प्रास्ताविक लातूर जिल्हा वकील मंडळाचे सचिव अँड प्रदिपसिंह गंगणे यांनी तर सुत्रसंचालन अँड मनिषा दिवे पाटील, अँड नरेश कुलकर्णी, यांनी केले आहे , आभार अँड रोहित सोमवंशी यांनी केले आहे

# बाभळगाव सबस्टेशनच्या खांबावर ऑपरेटरचा मृत्यू: ६ जणांवर गुन्हा



लातूर : लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील महावितरणच्या सबस्टेशनमध्ये तेथील अधिकारी, कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे एका खासगी ऑपरेटरचा बळी गेला असून खांबावरच शॉक लागून त्याचा मृत्यू झाला आहे. हा प्रकार निदर्शनास येताच काहिंनी महावितरण कार्यालयाची मोडतोड केली तर येथील एका अभियंत्यासह सहा जणांविरूद्ध भादेवी ३०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाभळगाव येथील पावर हाऊस सबस्टेशनमध्ये खांबावरील काम करण्यासाठी प्रकाश उर्फ बाळू भूजंग सोनकांबळे (वय ३०) रा. बाभळगाव या खासगी ऑपरेटरला चढविण्यात आले. पण योग्य खबरदारी व उपाययोजना न केल्याने सोनकांबळे यांचा खांबावरच शॉक लागून मृत्यू झाला. नातेवाईक व जमाव संतप्त झाला. त्यांनी महावितरणच्या कार्यालयावर दगडफेक केली. हा प्रकार रविवारी १२ मे रोजी सायंकाळी ५:१५ वाजण्याच्या सुमारास घडला. या प्रकरणी आज मयताच्या पुतण्याच्या फिर्यादीवरून लाईनमन सुधाकर साठे, विशाल शिंदे, रमाकांत लोखंडे, कल्याण मस्के, ऑपरेटर तानाजी लोकरे, अभियंता ओमकार तराळकर यांचे विरोधात लातूर ग्रामीण पोलिसांत भादंवि ३०४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित संस्था पदाधिकाऱ्यांनी देशीकेंद्र महाराज यांच्या पावन स्मृतीस्थळाला केले विनम्र अभिवादन



लातूर :- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर न्यासाच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे श्री. सं. क. कुलकर्णी (धर्मदाय सहआयुक्त, छत्रपती संभाजी नगर) यांच्या नियंत्रणाखाली दि. ०२/०५/२०२४ रोजी संस्थेच्या कार्यालयात संस्थेची निवडणूक संपन्न झाली. या सर्व नवनिर्वाचित संस्था पदाधिकाऱ्यांनी पाचशे घर मठ संस्थान, लातूर येथील देशीकेंद्र महाराज यांच्या पावन समाधी स्थळाला संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष आदिनाथ सांगवे आणि सचिव माधवराव पाटील (टाकळीकर) यांनी पुष्पहार घालून दर्शन घेऊन अभिवादन केले. यावेळी उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसेचिंचोलीकर), सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजय रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडीगावे, संचालक राजेश्वर बुके, संचालक बसवराज (राजू) येरटे, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक प्रभूप्पा पटणे, संचालक ॲड. काशिनाथ साखरे, संचालक प्रा. जी. एम. धाराशीवे, माजी प्राचार्य डॉ. काशिनाथ साखरे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार आणि पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेची पायाभरणी देशीकेंद्र महाराजांनी केली त्यांचे स्मरण करण्यासाठी आपण त्यांच्या समाधीस्थळावर आलेलो आहोत त्यांनी सन १९४२ साली माधवकरी (भिक्षा) मागून समाजातील गरजू आणि गोर-गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत निवासाची व्यवस्था व्हावी म्हणून वस्तीगृहाची निर्मिती केली. या वस्तीगृहातून नामवंत डॉक्टर, वकील, इंजिनियर आणि सामाजिक कार्यकर्ते त्यांनी आपल्या पूर्णपणे समर्पित भावनेतून केलेल्या कार्यामुळे निर्माण झालेले आहेत. देशीकेंद्र महाराजांनी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांची वचने आणि मानवी तत्वज्ञान आपल्या सप्ताहिकाच्या माध्यमातून समाजामधील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मराठवाड्यातील पहिली प्रेस देशीकेंद्र विद्यालयांमध्ये सुरू केली आणि आजही ती प्रेस अत्यंत उत्तम पद्धतीने जतन करून ठेवण्यात आली आहे. देशीकेंद्र महाराजांनी सन १९७१ला समाजातील सामाजिक आणि प्रतिष्ठित व्यक्तींना एकत्र करून गरजू आणि गोर-गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचे पवित्र कार्य समर्पित भावनेतून करण्यासाठी ही संस्था सुपूर्त केली. निजामकालीन व्यवस्थेमध्ये सुद्धा देशिकेंद्र महाराजाचे निजाम वेळोवेळी सल्ला आणि मार्गदर्शन घेतले जायचे. सन १९४७ मध्ये पुणे येथे स्व. मोतीलालजी नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमांमध्ये देशीकेंद्र महाराजांनी केलेल्या कार्याचा उल्लेख त्यांनी स्वतःहून केला होता असे दैनिक केसरी मधून प्रकाशित झालेल्या वृत्ताची माहिती सुद्धा त्यांनी या प्रसंगी दिली. तसेच देशीकेंद्र महाराजांनी आपले स्वतःचे घर, शेती व इतर मौल्यवान वस्तू समाजासाठी दान दिल्या असून त्याचा याचा योग्य विनियोग व्हावा या दृष्टिकोनातून त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. आज त्यांच्या समाधीस्थळाला अभिवादन केल्यानंतर त्यांच्या विधायक कार्याची आपल्याला सातत्याने आठवण येणे हे स्वाभाविक आहे. आपण सर्वजण त्यांच्या कार्याला विनम्रपणे अभिवादन करूया असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी देशीकेंद्र महाराजांचे समाधी स्थळाचे महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या सहकार्याने सुशोभीकरण केले जाईल आणि बेलपत्री स्मशानभूमी सुद्धा स्वच्छ करून त्याचेही सुशोभीकरण केले जाईल असे सर्व संस्था पदाधिकाऱ्यांनी ठरविले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE